CIDCO
WE MAKE CITIES



CIDCO

# प्रसिद्धी पत्रक
# PRESS NOTE

सिडको

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX 91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd /cidco CIDCO Ltd @cidco_ltd

## मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार सिडको महागृहनिर्माण योजना दिवाळी - २०२२ मधील बामणडोंगरी घरांच्या किंमती ६ लाखांनी करण्यात आल्या कमी

## यशस्वी अर्जदारांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मिळणाऱ्या अनुदानाच्या लाभासह अंदाजे रु. २७ लाखांत मिळणार सिडकोची घरे

मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या आदेशानुसार सिडको महागृहनिर्माण योजना दिवाळी - २०२२ मधील बामणडोंगरी, उलवे, नवी मुंबई येथील घरांच्या (सदनिका) किंमती रु. ६ लाखांनी कमी करण्याचा निर्णय सिडको महामंडळाकडून घेण्यात आला आहे. यामुळे मूळ रु. ३५ लाख ३० हजार किंमतीची सदनिका रु. २९ लाख ५० हजार या किंमतीला उपलब्ध होणार आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरिता प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत उपलब्ध असलेल्या रु. २.५ लाख रक्कमेच्या अनुदानामुळे यशस्वी अर्जदारांना ही सदनिका केवळ रु. २७ लाख या किंमतीला उपलब्ध होणार आहे.

**"सिडको महागृहनिर्माण योजना दिवाळी - २०२२ मधील बामणडोंगरी, उलवे येथील यशस्वी अर्जदार हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत उत्पन्न मर्यादा रू. ३ लाखापर्यंत असल्याने घरासाठी रु. ३५ लाखांची रक्कम उभी करण्यासाठी अर्जदारांना अडचणी येत होत्या. हे लक्षात घेऊन या अर्जदारांना दिलासा देण्याकरिता बामणडोंगरी येथील सदनिकांच्या किंमती कमी करण्याबाबतचे निर्देश सिडकोला देण्यात आले होते. त्यानुसार या सदनिकांच्या किंमती तब्बल रु. ६ लाखांनी कमी करण्यात येऊन, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मिळणाऱ्या रु. २.५ लाख रक्कमेच्या अनुदानासह प्रत्यक्षात या सदनिका अंदाजे रु. २७ लाख किंमतीला उपलब्ध होणार आहेत. याबद्दल संबंधित अर्जदारांचे अभिनंदन."**

**श्री. एकनाथ शिंदे**
**मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

CIDCO
WE MAKE CITIES



**"मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या आदेशानुसार सिडको महागृहनिर्माण योजना दिवाळी – २०२२ मधील बामणडोंगरी येथील सदनिकांच्या किंमती रु. ६ लाखांनी कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे सदर योजनेतील यशस्वी अर्जदारांना दिलासा मिळून त्यांचे नवी मुंबईमध्ये हक्काचे घर घेण्याचे स्वप्न साकार होणार आहे."**

**श्री. अनिल डिग्गीकर**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सिडको महामंडळामार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अर्जदारांकरिता महागृहनिमार्ण योजना दिवाळी २०२२ राबविण्यात आलेली होती. दि. १७ फेब्रुवारी २०२३ रोजी सदर योजनेची संगणकीय सोडत काढण्यात आली असून एकूण ४८६९ अर्जदार बामणडोंगरी येथील गृहप्रकल्पासाठी विजेते ठरले होते.

सिडको महामंडळातर्फे परिपूर्ण कनेक्टिव्हिटी लाभलेल्या नवी मुंबईच्या उलवे नोडमध्ये सदर गृहनिर्माण योजना साकारण्यात आली असून या योजनेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे.

यशस्वी अर्जदारांना इरादापत्रे पाठविण्यात आलेली असून, अर्जदारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी व वाटपपत्र निर्गमन प्रक्रिया अंतिम टप्यामध्ये आहे. यामुळे यशस्वी अर्जदारांना लवकरच सदनिकांचा ताबा मिळणे शक्य होणार आहे.

---